**अर्चना नेवरेकर फाऊंडेशन प्रस्तुत**

१६ व्या संस्कृती कलादर्पण २०१६

नाट्य महोत्सवातील ५ नाटक जाहिर

गेली १६ वर्षे सांस्कृतिक क्षेत्रात विविध उपक्रम घेऊन कलाकारांना प्रोत्साहन देण्याचे कार्य केल्याने संस्कृती कलादर्पण संस्थेने एक अढळ स्थान निर्माण केले आहे. नुकत्याच संपन्न झालेल्या यंदाच्या नाट्य स्पर्धेत सर्वोत्कृष्ट पाच नाटकांची निवड पुढील प्रमाणे करण्यात आली

१ ऑल द बेस्ट २ (अनामय निर्मित)

२ शेवग्याच्या शेंगा (श्री.चिंतामणी)

३ तिन्हीसांज ( त्रिकुट निर्मित)

४ परफेक्ट मिसमॅच (सोनल प्रोडक्शन )

५ डोन्टवरी बी हॅप्पी (सोनल प्रोडक्शन )

यंदाच्या नाट्य स्पर्धेसाठी प्रदिप कबरे, रोहीणी निनावे आणि अविनाश खर्शीकर यांनी परिक्षणाचे काम पाहिले.. यंदाच्या १६ व्या संस्कृती कलादर्पण भव्य नाट्य महोत्सव २०१६, दि.१९ ,२०, २१ मार्च रोजी माटुंगा रोड.येथील यशवंत नाट्य मंदिरात रंगणार असून नाट्य रसिकांना कमी तिकीट दरात दर्जेदार नाटकांचा लाभ घेता येणार आहे. तसेच संस्कृती कलादर्पण भव्य चित्रपट महोत्सव ६ व ७ एप्रिल २०१६ रोजी रविंद्र नाट्य मंदिर प्रभादेवी येथे साजरा होणार असून त्याची सर्वोत्कृष्ट १० चित्रपटांची यादी लवकरात लवकर जाहिर करण्यात येईल असे संस्थेचे चंद्रशेखर सांडवे अर्चना नेवरेकर सांगितले.

ह्या वर्षीच्या व्यावसायिक नाट्य स्पर्धेत एकुण २७ नाटकांनी सहभाग घेतला होता.

१. जय राधे माँ ( बोल राधा बोल)
२. मला वेड लागले संताचे.
३. अपना सपना फनी फनी.
४. सेल्फी .
५. लंडनच्या आजीबाई